RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ५६] मंगळवार, नोव्हेंबर २८, २०१७/अग्रहायण ७, शके १९३९ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १०४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८.**—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. पृष्ठे १-५

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर २०१७.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXVIII OF 2017.**

AN ORDINANCE

TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यांत यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१७ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३० ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ६.

" परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर व्यवस्थापन परिषदेच्या प्रारंभीच्या मुदतीसाठी, खंड (च), (छ), (ज) व (झ) खालील प्रवर्गांमधील उमेदवाराच्या निवडणुकीकरिता उक्त खंडांन्वये राखीव प्रवर्गांचे आळीपाळीने देण्यात येणारे आरक्षण हे, कुलगुरूकडून चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल, आणि अशा चिठ्ठ्यांची सोडत काढताना, प्रत्येक राखीव प्रवर्गातील व्यक्तीला व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधित्व मिळेल, याची सुनिश्चिती करण्यात येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर विद्यापीठ प्राधिकरणांच्या प्रारंभिक मुदतीसाठी निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया अशा प्रारंभाच्या दिनांकानंतर लगेच पुढच्या २८ फेब्रुवारीच्या आत पूर्ण करण्यात येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यामध्ये नवीन कलम ९९क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९९ नंतर, पुढील कलम जादा दाखल करण्यात येईल :—

विद्यार्थी परिषद घटित करण्यासाठी तात्पुरती तरतूद.

" **९९क.** कलम ९९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी, विद्यार्थी परिषद घटित करण्याच्या संबंधात, पुढील तरतूद लागू होईल :—

(१) विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी वेगवेगळ्या विद्यार्थी संघटनांच्या पाठ्येतर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे, एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल, विद्यापीठाच्या विभागांसाठी, एक विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद असेल आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालयासाठी किंवा परिसंस्थेसाठी किंवा प्रत्येक संलग्न महाविद्यालयासाठी, एक विद्यार्थी परिषद असेल. या परिषदा राजकीय चळवळींमध्ये भाग घेणार नाहीत.

(२) (क) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) विद्यार्थी विकास संचालक—सभापती ;

(तीन) संचालक, क्रीडा व शारीरिक ;

(चार) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना ;

(पाच) मागील पदवी परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि जो एखाद्या विद्यापीठात, परिसंस्थेत किंवा विभागात किंवा संचालित महाविद्यालयात पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला प्रत्येक विद्यापीठ विभागातील एक विद्यार्थी ;

(सहा) प्र-कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी आणि जर प्र-कुलगुरू नसेल तर, कुलगुरू दोन विद्यार्थिनींना नामनिर्देशित करील.

(ख) प्रत्येक परिसंस्थेच्या, संचालित महाविद्यालयाच्या किंवा संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) प्राचार्य—सभापती ;

(दोन) प्राचार्याने नामनिर्देशित केलेला एक अधिव्याख्याता ;

(तीन) राष्ट्रीय छात्र सेनेचा प्रभारी अध्यापक ;

(चार) राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रम अधिकारी ;

(पाच) मागील वर्षी घेण्यात आलेल्या परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि महाविद्यालयात जो पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, प्राचार्याने नामनिर्देशित केलेला प्रत्येक वर्गातील एक विद्यार्थी ;

(सहा) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, कोणताही असल्यास ;

(सात) ज्याने लक्षणीय यश मिळविले आहे असा, प्राचार्याने नामनिर्देशित केलेला पुढील क्षेत्रातील प्रत्येकी एक विद्यार्थी :—

(१) क्रीडा ;

(२) राष्ट्रीय सेवा योजना आणि प्रौढ शिक्षण ;

(३) राष्ट्रीय छात्र सेना ;

(४) सांस्कृतिक कार्ये ;

(आठ) प्राचार्याने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी :

परंतु, प्रवर्ग (सात) व (आठ) मधील दोन विद्यार्थी, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांमधील असतील.

(३) या दोन्ही परिषदांचे विद्यार्थी सदस्य आपल्यामधूनच संबंधित परिषदेचा सचिव निवडतील.

(४) (क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे पोट-कलम (३) खालील संबंधित परिषदांच्या सचिवांमधून निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या पंधराहून अधिक नसतील अशा व्यक्तींचा समावेश असलेली एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल :

परंतु, यापैकी प्रत्येकी किमान एक जागा पुढील वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येईल :—

(एक) अनुसूचित जाती ;

(दोन) अनुसूचित जमाती ;

(तीन) विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती ;

(चार) इतर मागासवर्ग ; आणि

(पाच) एक जागा विद्यार्थीनींसाठी,

उरलेल्या जागांचे जिल्हानिहाय वाटप करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्याकरिता, शैक्षणिक कामगिरी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना व प्रौढ शिक्षण, सांस्कृतिक कार्य किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये यांमधील सहभाग यासंबंधातील तपशील विचारात घेण्यात येईल.

(ख) अशाप्रकारे रचना करण्यात आलेली विद्यापीठ विद्यार्थी परिषद, स्वतःच आपला सभापती व सचिव निवडील ;

(ग) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या प्रत्येक बैठकीमध्ये कुलगुरू हा, अध्यक्षस्थानी असेल व विहित करण्यात येतील असे इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित असतील.

(५) कोणताही विद्यार्थी त्याची पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून नावनोंदणी झाली असेल तरच कोणत्याही विद्यार्थी परिषदेचा सदस्य असण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असेल.

(६) २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांचे नामनिर्देशन व्यवस्थापन परिषदेने निश्चित केल्या जाणाऱ्या दिनांकास करण्यात येईल. नामनिर्देशित विद्यार्थी सदस्यांचा पदावधी हा नामनिर्देशनाच्या दिनांकापासून सुरू होईल आणि तो पदावधी, दरम्यानच्या कालावधीत अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरर्हता त्यांनी आपल्यावर ओढवून घेतलेल्या नसतील तर, शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत अंमलात असेल, आणि त्यानंतर तो समाप्त होईल.

(७) परिषदेच्या एक-तृतीयांश सदस्य मिळून बैठकीची गणपूर्ती होईल. बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधीचे नियम व कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. परिषदेची दर तीन महिन्यांमध्ये किमान एक बैठक होईल. ”.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०९ च्या, पोट-कलम (३) मध्ये, खंड (घ) मधील, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

“ परंतु आणखी असे की, विद्यापीठास नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगी मागणाऱ्या अर्जांवर निर्णय घेणे सोयीचे व्हावे यासाठी, या अधिनियमाच्या, प्रारंभाच्या लगतनंतरच्या पहिल्या शैक्षणिक वर्षासाठी यासोबतच्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) आणि (घ) यांमध्ये निर्देशिलेले दिनांक हे उक्त तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :-

**तक्ता**

| खंड | विद्यमान तरतुदीमधील दिनांक | २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | वर्षाच्या सप्टेंबर महिन्याचा शेवटचा दिवस | १५ डिसेंबर २०१७ |
| (ग) | वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी | १५ जानेवारी २०१८ पूर्वी |
| (घ) | लगेच पुढच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी | २८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी ”. |

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १४६ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४६ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

“ (१) विद्यमान विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण हे, व्यवहार्य असेल तेथवर, परंतु २८ फेब्रुवारी २०१८ च्या अशा मुदतीच्या आत या अधिनियमाच्या तरतुदींनुसार पुनर्घटित करण्यात येईल. असे प्रत्येक प्राधिकरण हे, कुलगुरू अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून पुनर्घटित करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. ”.

## निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) हा, दिनांक १ मार्च २०१७ पासून अंमलात आला आहे. अशा प्रारंभानंतर, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार विद्यापीठाची विविध प्राधिकरणे व मंडळे घटित करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम १०९ मध्ये अंतर्भूत असल्याप्रमाणे, नवीन महाविद्यालय सुरू करण्याबद्दलच्या परवानग्या दिल्या जात आहेत, याचीदेखील सुनिश्चिती करणे आवश्यक आहे. तथापि, विद्यापीठांना अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना प्रारंभिक अडचणींना तोंड द्यावे लागत असून त्यामुळे विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे घटित करण्यामध्ये उशीर होत असल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. म्हणून, उक्त अधिनियमात तात्काळ सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) **कलम ३० ची सुधारणा.—**व्यवस्थापन परिषदेवर सर्व राखीव प्रवर्गातील व्यक्तींना यथोचित प्रतिनिधित्व मिळेल याची सुनिश्चिती करण्यासाठी, उक्त कलम ३० च्या पोट-कलम (४) च्या खंड (च), (छ), (ज) व (झ) यांअन्वये निवडून आलेल्या सदस्यांच्या बाबतीत, प्रारंभिक आरक्षण बिंदू चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करण्याचा अधिकार कुलगुरूला प्रदान करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(दोन) **कलम ६२ ची सुधारणा.—**प्रारंभिक मुदतीसाठी विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या सदस्यांची निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण करणे विद्यापीठांना शक्य व्हावे यासाठी निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठीचा अंतिम दिनांक हा, ३० नोव्हेंबरवरून २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत तात्पुरता वाढविण्याचे प्रस्तावित केले आहे.

(तीन) **नवीन कलम ९९क समाविष्ट करणे.—**विद्यार्थ्यांचे लोकशाही हक्क सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, नवीन कलम ९९क समाविष्ट करून त्याद्वारे २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी परिषद घटित करण्याकरिता तरतुदी करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(चार) **कलम १०९ ची सुधारणा.—**विद्यापीठाने सादर केलेल्या सम्यक योजनेच्या, मुद्यांवरील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या तज्ज्ञ समितीची शिफारस अंमलात आणण्यात येत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी, २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी देण्यासाठी आखून दिलेल्या कालमर्यादेत सुधारणा करण्यात येत आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २६ नोव्हेंबर २०१७.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सीताराम कुंटे,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.